
म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
२५५१



# यक्षरात्र

## अरुणा ढेरे

...आणि रंगगर्द क्षितिज पेटले
रात्री उजाडले क्षणमात्र ।।
तमाने टाकली प्रकाशाची कात
झाली काकळात यक्षरात्र ।।

REFBK-0020308
REFBK-0020308

संदर्भ काव्य
२५५२
२०३०८
२१५१८८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :–खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

20 JAN 1988
३१।१०।८८

( क्र. मा. पहा )
५०००–११–८६

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५३९
क्र. २०३०८
काव्य २१५१८

# यक्षरात्र

अरुणा ढेरे

REFBK-0020308
REFBK-0020308

सुरेश एजन्सी

प्रकाशक
गुलाबराव मारुतीराव कारले
सुरेश एजन्सी
२०५ शुक्रवार पेठ
पुणे ४११००२

© अरुणा ढेरे
' विदिशा '
१० अभिराम सोसायटी
तुळशीबागवाले कॉलनी
पुणे ४११००९

मुखपृष्ठ
सुभाष अवचट

प्रथमावृत्ती
महाशिवरात्र :
२६ फेब्रुवारी १९८७
किंमत पंचवीस रुपये

मुद्रक
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
' शिव-पार्वती '
टिळक रोड, पुणे ४११०३०

घराला—
माझ्या कवितेचे
त्याला जिवापाड कौतुक आहे.

## अनुक्रम


किती कसे आवरावे १
गर्द कवितांची तळी २
सांग ना ३
कारण ४
कार्तिकी हवा ५
नव्या-जुन्याच्या काठावरती ६
मर्म ७
पानांतुन हिरव्या कळा ९
सखि सांग १०
दे श्वास सखी कवितेला ११
घन जमता हृदयापाशी १२
माझ्या मनातला 'तो' १३
स्वतःतून असे नव्याने उगवताना १४
तुला स्मरताना १५
पणती १६
समजून घ्यायला हवं १७
तू नसताना १८
पुन्या गाण्यासाठी १९
तडफड २०
तू गळ्याची शपथ घ्यावी २२
अंतर २३
इथून पुढचे सारे २४
तेरुओ २५
बहर २७
सजणचाहूल २८
मी लिहीन २९
प्राणां फुटावीत पाने ३०
वसा ३१
आर्त ३२
मोर ३३
आठवण ३४
दिवेलागणीआधी ३५
केळीखालती न्हाताना ३६
आणि हवे तरी काय ३७
पाणी ३८
संज्ञेच्या पैलतटाला ३९

मी बघते ४०
हे रूपधर प्रेम ४१
मेघ उतरले दूर ४२
यक्षरात्र ४३
आयुष्याचा सगळा अर्थ ४४
ओवी ४५
नकोच काही ४६
समंजस हिवाळा ४७
अर्पण ४८
पाऊस : चार कविता ४९
उत्सव ५३
नाते ५४
आत्ता आत्ता ना आलास ५६
म्हणायचे आहे मला ५७
सहज प्रियाला बघता बघता ५८
पोर ५९
सार्थक ६०
भास ६१
समजूत ६२
असे पाऊल भेटव ६३
पुरे नाही का एवढे ६४
आकांत ६५
वन आले म्हणता म्हणता ६६
समोरच्या घरातला तो म्हातारा ६७
माहेरी बोलवा ६८
झोका ६९
सण ७०
शपथ ७१
पाऊस ७२
सांज ७३
जुळू दे ना गाणे ७४
ऊन ७५
देठ ७६
ढग ७७
आठवण ७८
कैफ ८०

# यक्षरात्र

१९८० ते १९८६
या काळातील कविता

अरुणा ढेरे

तमाने टाकली प्रकाशाची कात
झाली काळजात यक्षरात्र !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५५७
दा. क्र. २०३०८
काव्य
२।५।८६
संग्र. शाखा (स्थळ प्रत)

## किती कसे आवरावे ?

किती कसे आवरावे मुके कढ आता
माझे ओथंबले मन
दाटलेल्या पान्ह्यामुळे जसा दुखे स्तन।

रंग ओला प्राक्तनाचा—कलंकाचे धन
झाले सांध्यमय जिणे
पक्ष्यापरी भोवंडती माथ्याशी मरणे।

आता नको आणखी तू हसूनिया जाऊ
असे कसे सहायचे ?
माझ्या विश्वासाचे पुन्हा उलटेच फासे।

सीता भूमिमग्न, राम गवताला धरी
केस वैदेहीचे कुठे ?
निसटल्या आयुष्याची कशी धरू बोटे ?

## गर्द कवितांची तळी

किती सोसाव्या साजणा
तुझ्या ओळखीच्या कळा
तुझ्या सहज स्वप्नात
माझ्या वेदनेच्या वेळा ।

वाट शपथांची वळे
दाट विश्वासाचे रान
किती विस्ताराव्या हाका
तुझे हलेनाच पान ।

कशी अक्षरे भोगावी
तुझ्या खेळीं जाती बळी
रक्तचांदण्यात न्हाती
गर्द कवितांची तळी ।

## सांग ना !

तुला समजू न शकणाऱ्या जाणिवांचे हुंदके
गळाभर दाटून येतात.
आवरले नाहीत तर ओठांची थरथर होतात.
अन् फारच असह्य झाले की
कविता होऊन कागदावर ठिबकू लागतात.

अस्मितासंपन्न दुःखाचे रचनाबंध
कसे स्वीकारले आणि आस्वादले जातात,
हे मला सांग ना !

## कारण

चंद्र उगवला की चंद्रकांत मणी पाझरतो म्हणतात.
पण अंतराची असली समीकरणे मला कधीच जमली नाहीत.

मैलोगणती पसरलेल्या क्षणांच्या घट्ट जाळीतून
एकमेकांचे नुसते अस्तित्व कळत असताना,
आम्ही एकरस-एकजीवच आहोत असे म्हणणे,
किती असुरक्षित आहे अन् असह्यही—
याची उदाहरणे मला शब्दांनी सांगवत नाहीत.

तुझ्या-माझ्या तटांमधला प्रवाह रुंदावण्याचे
कदाचित् हेही एक कारण असेल !

## कार्तिकी हवा

किती समजूतदार असते ही कार्तिकी हवा !
जगून घेतलेल्या आयुष्यातले तीक्ष्ण-तीव्र अनुभवांचे अर्थ
किती सहज ओल्या धुक्यातून आपलेसे करते !
अन् प्रियकर,
येणाऱ्या प्रहरांची उत्तेजक बेभान चाहूल
किती अलगद, सावध शांतीत रेंगाळत ठेवते—ही कार्तिकी हवा !

तुला पानगळीची अस्वस्थता का वाटते ?

तुझ्यामाझ्याइतकीच या झाडांनीही,
रिकाम्या फांद्यांवर आकाशाची निळी घरटी सहज विणून घेताना
जगवली आहे निर्मितीची आंतरिक संवेदना.

जरा खोलवर उडू दे शिशिराचा पाखरथवा,
त्यासाठीच तर ही समजूतदार कार्तिकी हवा !

## नव्या-जुन्याच्या काठावरती

नव्या-जुन्याच्या काठावरती
घन वळले रे उमाळणारे
नव्या-जुन्याच्या काठावरचे
भिजले वारे, भिजले सारे.

तत्त्वज्ञानी दगडांवरती
उमटत गेली ओली नक्षी
सळसळणाऱ्या भेगांमधुनी
हळुच उडाले लबाड पक्षी

मऊ भुईतून तरारलेल्या
पानांवरती उघडे डोळा
जुन्या मुळांना नव्या रसाचा
ऐकू येई घुंगुरवाळा

इतिहासाचे भक्कम ढलपे
उडुन निघाले हळूच सगळे
इवले इवले जीव हजारो
मुक्त सुखाने रांगत सुटले

काल-आजचे, इथे-तिथेचे
मिसळुन गेले काहीबाही
श्वास मिळाला जगण्याला अन्
फिरली रे करुणेची द्वाही

अजाणतेच्या आसपास ही
जाण विखुरली थोडी ऐसी
नव्या-जुन्याच्या काठावरती
पाउस-ओली हृदये जैसी.

## मर्म

सळसळत्या वाऱ्यावरती
कुणि मंतरलेले बोल
धाडिले, जिवाला पडली
कशि मुक्त क्षणांची भूल !

सोडिला करंडा भरला
मी पाण्यावरती हलके
अन् खुडुन मोकळे केले
केसांचे अल्लड झुबके.

मोकळा गळ्यातुन केला
सर गर्द कृष्ण गीतांचा
अन् शब्द पुसुनिया आले
मी देहाच्या कवितांचा.

परि बावरले मी बायो !
हे नव्हेत माझे मेळे
जणु चुकलेल्या कळपात
कपिलेचे व्याकुळ डोळे.

किति धूळ भोवती उडते
क्षितिजांचे गोंधळचाळे...
मज हाक तुझी सापडली
मी चकवा टाळुन आले.

समजूत भरुनिया भाळी
रक्तात स्नेह अंथरले
काळीज करुन कोनाडा
मी दिवे हळू लावियले.

जन्मांची माया यावी
माणूसपणाच्या काठी
तशि पिकलेल्या ओवीची
प्रार्थना तरळली ओठी.

मग भोगांच्या पलिकडले
हळुवार जागले मर्म
सनईतुन कातरवेळी
जणु नादसतीचा जन्म !

## पानांतुन हिरव्या कळा

पानांतुन हिरव्या कळा, दाटतो गळा झिरमिरे पाणी
ही सायंकालिन वेळ, व्यथांचा मेळ ज़मविला कोणी ?

थरथरतो अंधारात, आत प्राणांत सूर कुठलासा
साचल्या जळातुन हले, हळू झिळमिळे कवडसा जैसा !

पक्ष्यांची दुखरी पिसे, फुलांचे तसे हुळहुळे अंग
विस्कटते घरटे भिजुन, पाकळीवरुन उडाले रंग

विरलेल्या पाउसखुणा, तरी का जुना उमाळे घाव ?
व्रण दुखवी हृदयापास, जागवी आस, कोवळे भाव ।

किति करुण वनाचा गंध, घेउनी मंद ओघळे वारा
पुसटसा दिसे दूरात, जसा स्वप्नात सुखाचा तारा ।

मी व्याकुळ गाणे गात, असे विजनात लाविले दीप
उजळता राउळे येथ, कुणी सत्त्वस्थ दाखविल रूप ।

## सखि सांग

सखि सांग, भोवती जमता
दुःखांचे फसवे मेळे
मी कसे, कुठे शोधावे
सल खोल, जिव्हारी भोळे ?

गे क्षणात बाजुस होती
स्पर्शता तळातुन नाती
ओंजळीत घेता मूल्ये
भुरभुरू गळुन ये माती

पाहिले मोर तत्त्वांचे
ते सर्व पिसे झडलेले
अन् ओळख हिरवी जेथे
ते पान कुणी खुडलेले

सखि सांग, निरामय आता
आयुष्य कसे भोगावे
अन् शब्दाविण झरणाऱ्या
कवितेचे साक्षी व्हावे ?

## दे श्वास सखी कवितेला

वेदना निनादत यावी ही तशीच आली प्रीती
क्षणस्पर्शाच्या वळिवाने गात्रांची भिजली माती।

असणे हे सार्थक ज्याचे, आवेग तसा दरवळला
अन् मनात अनुरागाचा अंधारदिवा लावियला।

वक्षात हवेच्या भरला, देहात तसा सुमगंध
मरणाच्या काठावरुनी पाऊल निघे बेबंद।

वृक्षांची छाया तैसा विश्वास डवरुनी आला
करुणार्त नदीच्या काठी भोगाचा उत्सव सजला।

आयुष्य अशाश्वत, कुठला आधार मुक्या वचनांना
मी जातक सांगू कैसे या उदास मृगनयनांना ?

गे जन्मातुन भळभळती मी ओळख देइन तुजला
एवढेच उरले हाती, दे श्वास सखी कवितेला।

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
सा. क्र.
शाखा

## घन जमता ह्रदयापाशी

जांभळ्या डोंगरी पडतो
पाऊस, दूर वन न्हाले
क्षण भरुन पुन्हा
ये वास जुना
टपटपले शैशव ओले।
अन् चंद्र चुलीवर फिरता
चमकले भुकेचे डोळे।

पानांवर चढते चांदी
हर्षाचा पारा निथळे
काळोख निळा
ये भरुन गळा
शब्दांचे दुःख निराळे।
नाकळत्या अर्थापाशी
मोराचा पंख झळाळे।

पापण्या उडुन जाताना
स्वप्नांवर मधुर शहारे
माझ्यातुन मी
बहरते नवी
सल सगळे दरवळलेले।
घन जमता ह्रदयापाशी
आयुष्य थेंब बनलेले।

## माझ्या मनातला ' तो '

एक दिवस सारे असह्य झाल्यासारखा
माझ्या मनातला ' तो ' उठला
आणि माझ्या हातातले पुस्तक मिटवून म्हणाला—
" या मेलेल्या उजेडात तुला वाचवते तरी कसे ?
आणि वाचतेस तरी काय ? हे आढ्याचे उलटे वासे !
स्वतःतून स्वतःपर्यंत फिरण्याचा, पुरे ना हा ठराविक खेळ
अनंत वाटांनी तिथवर आणि सर्वत्र पोचता येते.
चल, आपल्यातूनच तर हा काळ–ही वेळ ! "

संभ्रमांचे पलिते वाटेवर पेटवले
आणि त्याच्या पावलांनी सरळ निघाले...

मी पाहिले उंच देवदार
ईर्षेने हिमशुभ्र आकाशाला स्पर्श करणारे,
ऋग्वेदाच्या जन्माआधीचे तरुण वारे,
आणि उद्धत पौरुषासारखे पाणी जमीन-घुसळत फेसाळणारे...
उजेड–लखलखत्या इच्छांसारखा प्रसवशील,
पक्ष्यांचे थवे–सामूहिक चेतनांसारखे गतिशील....
एकमेकांत गुंतलेल्या प्राकृतिक वासनांसारखी
गवती पात्यांची गुंतागुंत,
आणि नृत्यगीतांतून थरकणाऱ्या साद-पडसादांसारखे
ऋतूंचे दर्शन....मोकळे, उत्स्फूर्त.

हे मी एकदाच पाहिले, पण मला कळले. मिळाले.

' त्याच्या 'शिवायही आता मी जगते
काळापार, मागे आणि पुढेही, जेव्हा मी माझ्या आत आत उतरते
आणि जेव्हा नुसतीच बाहेर पहात असते,
तेव्हा भीती वाटते...
या मेलेल्या उजेडात सामूहिक जगण्याचीच भीती वाटते....

## स्वतःतून असे नव्याने उगवताना

स्वतःतून असे नव्याने उगवताना
दरवेळी नवे आकाश विणणे जमेल, असे सांगता येणार नाही.

मागच्या समृद्धतेच्या सावल्या
याही ऋतूत फिरून शेतांवर पडणार नाहीत,
किंवा,
तात्कालिक हवेशी संधिस्मित करणारी पाखरे—
नकळत जुनी दुःखशीळ घालणार नाहीत, असे सांगता येणार नाही.

तुला देता येईल असे एकही आश्वासन माझ्याजवळ नाही.
आणि पंख छाटलेल्या पाखरांचे उरात दिशा घेऊन वांझ असणे
तुला माहीत नसेल असेही नाही.

तुला एखादी कविता द्यावी म्हटले जुन्या नात्यांना स्मरून,
पण मला कधीचेच त्यांच्यातून दूर व्हायचे होते.
माझी नाव वल्हवायला मला माझेच हात हवे होते.

आता हात नाहीत. आणि शब्दांचे वागणे बदलले आहे.
माझे पाणी बदलले आहे—
माझे जाणे आणि गाणेही बदलले आहे.

## तुला स्मरताना

तुला स्मरताना । डोळां नाही पाणी
स्फटिकाचा मणी । मन होते ।।

बाहेरून आत । आतून बाहेर
सासर माहेर । एकावते ।।

उजेडाचे घर । लावण्याचे भास
संज्ञेची आरास । मांडीयेली ।।

मांडलेला खेळ । तुला भावलेला
मिळोनिया गेला । अर्थ मला ।।

इवल्या दु:खांचे । गर्भ प्रकाशती
तुला ही आरती । जन्मवेळी ।।

तुला स्मरूनिया । शब्दापाशी येते
आणि संपविते । सारे काही ।।

## पणती

कुणिकडे वाट ही जाते, मज काहि कळेना बाई
हे अरण्य हिरवे राही, कोंदून दिशांना दाही।

हिंडतो आंधळा वारा, पायांत बांधुनी चाळ
वेळूत गुंतुनी पडली नादाची तुटकी माळ।

सागाच्या भिंतींमधुनी कोंडल्या सुखाच्या हाका
पाखरे विसरुनी गेली आश्वासक आणाभाका।

भीतीचे कातिव सुळके झेपावत दूर नभाशी
अन् घोंघावत ये पाणी प्राणांच्या थेट तळाशी।

किति उग्र वनाचा गंध सर्पापरि विळखे घाली
सय आईच्या शब्दांची ये आकुल अन् तान्हेली।

काटेरी अंधाराच्या जाळीत कोण गे रडते
गाण्याच्या बाळजिवाचे घर स्फुंदत दूर रहाते।

देहाचे पान थरारे, मज हवीच माझी माती
दुःखाच्या ओटीवरती तू लाव स्मिताची पणती।

## समजून घ्यायला हवं

झाडांतून अंगोपांगी बहरलेले तजेलदार हिरवे अस्तित्व होते
आणि गंधर्वप्रासादातून उतरणाऱ्या स्फटिकस्वरासारखी
राजविलासी विजिगीषा होती.
म्हणजे तू होतासच.

रंगांच्या कोवळ्या चैतन्यातून थरारणारी, पाखरासारखी अपाप हवा होती
आणि आतून उजळत काठोकाठ आंदोळणारे पाणी होते.
तेव्हा मीही होते.

पण कमळाच्या दुमडलेल्या पानांतून,
ढगांच्या वळशावेढ्यांतून आणि झाडांच्या सांदीसापटीतून
थोडा सावळा अंधार होता,
बगळ्यांच्या तकतकीत पंखांवरून येणाऱ्या वाऱ्यातला
गारवा जरा दुखरा होता.
तेव्हा आपल्यातलं नातंही होतंच.

आता, झाडांतून उतरताना हिरवे होणारे हे उन्हाचे कवडसे
आणि अपरंपार गवतावरची ही गर्भरेशमी पक्व झळाळी
यांना आपण समजून घ्यायला हवं. हो ना?

## तू नसताना

तू जवळ नसल्याची तडफडती बेचैनी
आणि असल्यानंतर गळामिठी घालताना,
गात्रांत रिमझिमणारे चंद्रमदिर आसक्त पाणी
यांचे आयुष्याला पडलेले सर्पधुंद वेढे होते
तेव्हा या देहस्वी प्रदेशाशिवाय, अन्यत्र कुठे
तृप्तीची तळी असतील असे वाटलेही नव्हते.

आता आभाळ निवळ, हवा संथ आहे
विलासी चंद्र मी जरा काढून ठेवला आहे.
पाऊसही नाही यायचा आता.
मनात वाजते आहे ती फक्त नितळ शांतता.

तू जवळ नाहीस म्हणून वेडे दिवस मला पुन्हा छळत नाहीत.
( तू असतानाही हल्ली जसे ते अंगावर येत नाहीत. )
एका क्षणातून दुसऱ्या क्षणात लांबवर पसरलेला नवजात विश्वास
परावर्तित होतोय् हातांवर—पायांवर—चेहऱ्यावर
आणि आपल्या छोट्या घरावर

हे ऊन, की तुझे समजूतदार अस्तित्व ?

तू नसतानाही जगणे एवढे सहज आहे,
हे केवढे मोलाचे आहे !
तू असण्याइतके हे ऊन एवढे हवेसे आहे,
हे किती निरामय आहे !

## पुन्या गाण्यासाठी

एक शब्द दिला तुला
विश्व ' सबंध ' हालले
पुन्या गाण्यासाठी आता
जन्म येतील मागले...

## तडफड

ढग पिकलेले पिवळे होते
सांजगीत ओठांवर कलते—जराजरासे
म्हटले नव्हते मुळीच काही,
फक्त स्वरांचे दिशांत दाही—खोल उसासे

तुला पाहिले तसल्या वेळी
थरथरली प्राणांची जाळी
जाणवला मज वास तमाचा
खारट, आंबट स्वाद हवेचा.
कळले तेव्हा उरात दुखते, ते हे आहे
कळले साखरस्वप्नी सलते, ते हे आहे.

जे आमंत्रण निळे जांभळे
गच्च लपेटुन जिवा राहिले
आणिक आता तुझ्यातुनी ते आले जवळी
कधीच गुंतुन गेले होते मी त्या खेळीं—
नव्हते कळले.

तेव्हापासुन हलू लागला
मंद तुझा स्वर आयुष्याला
उन्हात झुलती निळे कवडसे
हसण्यावरती फिरते दुखरे पीस जरासे,
आणिक येते लख्ख झळाळी
नजरेलाही, पक्व फळावर जैसी लाली

हवेहि आहे, शपथ जिण्याची.
नकोनकोची तरी असोशी.
मीच अशी वैरीण स्वतःची.

जे घडले ते घडून गेले,
विलग मला ना करता आले स्वत:पासुनी
अखंड तडफड अशीच आता,
जशी दुखावी मनात कविता–शब्दावाचुनी

## तू गळ्याची शपथ घ्यावी

तू गळ्याची शपथ घ्यावी : ‘ मी तुझी रे साजणा ! ’
आणि मी वाटून घ्याव्या तुजसवे निज यातना

प्रेम भोगावे जरासे, पांघरोनी वासना
आतडी सजवुन भोळी, रंगवावा पाळणा!

मांस थोडे, अस्थि काही, रक्तपेशी वाहत्या
अन् खुळ्या हृदयात थोड्या मूर्ख आशा नांदत्या

बाळ अपुले ! आणि तू-मी सांग कोणाचे सखे ?
हे कुणाच्या निर्मितीचे विश्व दु:खासारखे ?

भोवताली हा कुणी, अन् तो कुणी माझा सखा
मी कुठे आधार दे-घे तोहि वेड्यासारखा

‘ मी असा ’ अन् ‘ तू अशी ’ हे कुठवरी सांभाळणे ?
या प्रवाहावेगळी नौका कुठे हाकारणे ?

वेगळा बुक्का कपाळी, रक्त-हाडे सारखी
तीच आयुष्ये स्वत:च्या सार्थतेला पारखी

तो कुणी ज्याने दिलेली डोळियांना बाहुली
जन्ममरणाची सुखे तो खेळतो चेंडूफळी

गे सखी तान्ह्या स्वराला तोच देतो चंद्रमा
आणि होते काजळी मेंदूत इवली पौर्णिमा

तो कुणी अज्ञात येतो शब्दगर्भी पाहुणा
तू मला म्हणतेस तेव्हा : ‘ मी तुझी रे साजणा ! ’

## अंतर

हे अंतर ' हो ' आणि ' नाही ' मधलं !
दिठीपार लांबच लांब पसरलेल्या
तप्त रेगिस्तानात हरवलेले काफिले....
थकून अर्ध्यात कोसळणारे प्रवासी.
आणि निर्हेतुक घंटा वाजवित, अनाम दिशेने
एकएकटे उंट सैल भरकटलेले...
जिवंतपणाच्या छातीत रोवलेल्या त्यांच्या पावलांमधलं—
हे अंतर ' हो ' आणि ' नाही ' मधलं...

विकल अरण्यातून मध्यरात्रीच्या पिसाट हाका
सैरावैरा फिरताना,
गर्द काळोखाची आंधळी बोटं
वाऱ्यावर असह्य चाचपडताना,
' आ ' वासलेल्या आयुष्याच्या तोंडात निमूट जाणाऱ्या दोन श्वासांमधलं
—हे अंतर ' हो ' आणि ' नाही ' मधलं.

मी तुडवत गेले हे वाळवंट,
आणि अंधाराचे मैलोगणती प्रदेश.
तुझे निरोप नव्हते सोबत आणि नव्हत्या श्रद्धांच्या वस्त्या.
भोवती विश्वासाचे तळ उजाड आणि मूल्यांचे अनोळखी वेष.

पण यापलिकडच्या प्रदेशात
माझ्यासाठी तुझे एक हृदय आहे
आणि दयाघन कवितेच्या आभाळात
नव्या शब्दार्थांचा उदय आहे,
ही वस्तुस्थिती ओंजळीत घट्ट जपत मी पार केलं—
हे अंतर ' हो ' आणि ' नाही ' मधलं.

तुला हे काहीच नाही कळलं...

## इथून पुढचे सारे

इथून पुढचे सारे तुझे आहे
माझ्यातून फैलावलेले
आणि तू, माझ्यासकट पुन्हा माझाच !

वाट ?–ती तर कालही होतीचना पायांखाली,
तशीच अर्धी तापलेली, अर्धी ओली उमललेली.

तिचे असणे इथून पुढे आपल्यासाठी असणार,
एवढे मात्र लक्षात ठेवायचे.
बदलाचे अर्थसंदर्भ तर काय, झाडेही शिकवतील.
तेवढे समजून घ्यायचे.

मग सुरू होतील अभावाचे उत्सव
आणि आंतरसमृद्धीची व्रते अनाद्यंत.
मातीपासून थेट आभाळापर्यंत
माझ्यापासून थेट तुझ्यापर्यंत.

तिथून पुढचे सारे माझे आहे
तुझ्यातून विस्तारलेले,
आणि मी, तुझ्यासकट पुन्हा तुझीच !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५५१
काव्य ग्रं. क्र. २०३०८
२१५१८
शाखा (स्थळ प्रत)

## तेरूओ

पांढुरक्या धुक्यानं सर्दावलेली हिवाळी वस्ती
राखाडी झाडांच्या सडसडीत फांद्यांवर लटकलेली
पिवळ्या पानांची क्षीण आसक्ती,
अन् पहिल्या जांभळ्या हवेची गारठलेली जीवनशक्ती.
त्यातूनच मी
अशी लळत-लोंबत सांस्कृतिकतेचे सगळे संदर्भ वागवणारी
नि नात्यांची अवजड ओझी सावरत पाय उचलणारी.

तू मला दिसतोस नेमक्या अशा वेळी
मी अचानकपणे स्तब्ध ... बावरून वेंधळी
स्वत:ची लाज वाटण्यापूर्वीच
तू कसा आख्खा हवासा वाटतोस ?
प्राणाहूनही प्रिय....कसा सुंदरतम होत जातोस ?

रे, मला तसं स्नेहानं जवळ ओढून घेताना
माझ्या लळ्यालोंब्याचं तू काय करतोस ?
ऋतूंची, अतिमधुर वासाची फुलं तुझ्या खिशात
आणि मला हुंदके अनावर होतात.
या माझ्या वेडेपणाला तू कसं सांधून घेतोस ?

निसटून गेलेले सगळे सुंदर क्षण
तुझ्या डोळ्यांत पुन्हा पुन्हा लुकलुकतात,
निरभ्र रात्रीच्या नक्षत्रजडीच्या आभाळासारखे
आयुष्यातले तिढे रांगोळी बनतात.
हिवाळ्याच्या सर्द धुक्यातून, उन्हाच्या चाहुलीचे
सायसाखरी श्वास नाचतात.
माझे हुंदके हळूहळू विरू लागतात.
म्हणतोस, ' असू दे, रडून घे सई. '

जिवणीच्या कडेला मग इवलं अर्धं हसू फुटतं.
तेव्हा नजरेची जिव्हाळ बोटं त्यावर टेकवीत
म्हणतोस, ' असू दे, असू दे हेही. '
हिवाळ्यातल्या सर्द धुक्यातून मग
प्रथम पिवळा, नंतर लालजर्द, पुन्हा केशरी
असा रंगीबेरंगी सूर्य–अगदी डोळ्यांसमोर
उगवून येतो.
( तोच तेरुओ. तो गौरी देशपांडेचा असतो. )

## बहर

लख्ख हासता हासता झाले मनभर ऊन
मनजडीच्या उन्हाने गेले आभाळ भरून ।

काल काळोख रुजला मंद रातपावसाने
अर्ध्या पहाटेची केळ प्रसवली नवसाने ।

आजघर-माजघर वारियाने सावरले
उगवतीच्या रंगाचे दारी सडे घालियेले ।

घर अंगणात आले, गेले रानात अंगण
मुक्ताईच्या अभंगाचे झाले पायांत पैंजण ।

पाय ओले ओले माझे, ऊन उमटे मातीत
ऊन गाईच्या डोळ्यांत, ऊन तळ्याच्या दिठीत ।

नवलाच्या देठातून वाके विश्वाचा संसार
मनजडीच्या उन्हाला आला बहर बहर ।

## सजणचाहूल

गे घरास गाई आल्या
सांजेची उडते धूळ
हृदयात उजळते दुःख,
रानात दिव्यांची ओळ.

सरसरून आले श्वास
मउ निरोप प्रहरांवरचे
अर्धाच हुंदका, आणि
अर्ध्याचे बोल सुखाचे

ही कसली कातरवेळा
गाठून भाग्य ये हृदयी
झरझरतो चंद्र प्रवाही,
काठाशी रडते जाई.

मज बसून शेजीं आई
हातात चुडा गे चढवी
अन् हळदकळा सासरची
अंगांग हळुहळू मढवी.

आईला आंदण उरली
बघ, भातुकलीची माती
सइ, तहान ठेवुन मागे
जातेच नदी गे पुढती

गे घरास गाई आल्या,
सांजेचे फुलते फूल.
अन् वाट लाजरी सजते
माळून सजणचाहूल.

## मी लिहीन

मी लिहिणार नाही रात्रीच्या चंदनी समुद्राविषयी
आणि नदीवर वाकलेल्या झाडांच्या दिवसाच्या प्रतिबिंबाविषयी.

रात्रीच्या काळजातली कळ, गाजेसारखी मग अंगभर भिनेल
आणि सरकताना बुंध्यातली वाळू, वृक्षांची गळामिठी पाण्याला पडेल.
मला हे थोपवता येणार नाही—मी लिहिणार नाही.

मी लिहिणार नाही काळजातल्या वस्त्यांविषयी
आणि आपल्यात उमलणाऱ्या नात्यांविषयी.

कारण कोणत्या क्षणी फुलपाखरू होऊन
ते कोवळं पोपटी जग उडून जाईल
अन् शब्दांसारखंच हाती येऊन, जीव लावून
अज्ञात आनंदात मावळून जाईल,
हे सांगता येणार नाही. मी लिहिणार नाही.

मी लिहीन माझ्यात रुजत चाललेल्या अंधाराविषयी
अकारण फुलणाऱ्या धमनीतल्या अंगाराविषयी
आपल्यात नसून असलेल्या थोड्या दुराव्याविषयी
कवितेइतक्या जीवघेण्या त्याच्या पुराव्याविषयी.

मी लिहीन तुझ्यामाझ्यातून निसटून गेलेल्या क्षणांसाठी.
कितीक अपुऱ्या दिवसांच्या कवितांसाठी. त्यांच्या व्रणांसाठी.

## प्राणां फुटावीत पाने

रेष दु:खाची ओढावी
तसे रेखले क्षितिज
फुले फांद्यांना, तसे हे
हसू ओठांवर आज।

आला भरून पाऊस
अंगी जडावली हवा
मऊ मातीच्या पायांना
गच्च लपेटे गारवा।

दूर वाजावे मेघांनी
तशी आठवण तुझी
मंद वाजली मनात
जुनी गाणी झाली ताजी ।

कशासाठी कुणासाठी
बाई, देह ओंजळला ?
गेल्या जन्मांचा गजरा
हाती फुळ्फुळ्‌ आला।

स्वप्न देवाच्या मनीचे
दु:ख स्फटिकले तसे
अव्यक्ताच्या माथ्यावर
ओले आशयाचे ठसे ।

फिक्या तंद्रीचा पाऊस
आता कोसळावे त्याने
व्हावा आकांत सगळा
प्राणां फुटावीत पाने।

## वसा

अदृष्टाशी बोलण्याचा वसा घेतलास पोरी
आता तुटेल जगाशी तुला बांधणारी दोरी

पोरी, आभाळ चालणे नव्हे इतुके सहज
जाते पाऊलखुणांची लख्ख पुसून ओळख

तीव्र उन्हाची ओंजळ लागे भरून धराया
श्वासाश्वासावर लागे उभा अनंत पेलाया

तुझ्या कुंवार ओटीत पृथ्वी घालील नारळ
पोरी उदंड हवे ग, हवे सोसण्याचे बळ

धागा धरून येतील जन्म माघारी गेलेले
नको हलवूस ओठ, त्यांत भविष्य गोठले.

असा अघोराचा वसा घेऊ नये तो घेतला
देह देऊन दुःखाला आता पाहिजे चालला.

चूड प्राणांची लावून कर आयुष्याची होळी
तेव्हा कुठे जुळतील दोन कवितेच्या ओळी.

## आर्त

सरकून मेघ जाताना
गलबलते आत कुठेसे
सुनसान हृदयवाटेला
सुख रडते आत कुठेसे.

निसटल्या ईश्वरी हाका
हरवली सनातन नाती
स्मरणावर फुलुनी येता
कालवते आत कुठेसे.

करुणेतुन तेज झरावे
प्रार्थना तशी मग स्फुरते
गे भान निळ्या पापांचे
मालवते आत कुठेसे.

श्वासाइतकेच स्वतःचे
गीतात दुःख हलताना
शब्दांचे हिरवेपण गे
पालवते आत कुठेसे.

सरकून मेघ जाताना
लवलवते आत कुठेसे
कोवळे आर्त जन्मांचे
गलबलते आत कुठेसे.

## मोर

शब्दांत मेघ दाटावे
तुला भेटावे
पाऊस उसासुन यावा।

गाण्यात थेंब नाचावे
तळे साचावे
काठाशी मोर झुलावा।

## आठवण

ओली माती, ओले रान
वारा हुंगतो बेभान।

मोर तळ्याच्या पाळीला
डोळे पानांच्या जाळीला।

अर्ध्या स्वप्नाचा पाहुणा
पक्षी घालतो उखाणा।

गेले मिरकत मेघ
नभी ओली वीजरेघ।

डोली शकुनांची आली
थोडी पांगापांग झाली।

थोडी पांगापांग झाली
...तुझी आठवण आली।

## दिवेलागणीआधी

हे दिवेलागणीआधी अवकाश हळू झाकळते
मज आईच्या वासाचे आयुष्य पुन्हा आठवते।

आईने म्हटले गाणे, नेहमी फिरवता जाते
ती जात्यावर गाताना मी जन्म जागवित होते।

आईच्या मांडीवरती निजली मग सोळा वर्षे
गाण्यातून मोठा झाला हृदयाचा पैस सहर्षे।

आयुष्य पशाने दळता, एकदा अचानक रडली
अंधार डसावा तैसी, तडफडून आई कण्हली।

गिळले जे दुःख मुक्याने ते वीष होउनी भिनले
झोडपल्या केळीऐसे मन आईचे चिरफळले।

अवसेची झाली बाधा, आई मग हरवून गेली
फाटक्या मुठीत निजेच्या, गाण्यांच्या उरल्या ओळी

आईने होता शिवला, तो पुन्हा उसवुनी आला
तो ऐन मध्यरात्रीचा अंधार पुन्हा लक्तरला।

पदरात बाळपण माझे बांधुनिया आई विझली
उरलेल्या जगण्यावरती दुःखाची साय पसरली।

या सायीची चव जेव्हा ओठांत मऊ साकळते
मज आईच्या वासाचे आयुष्य पुन्हा आठवते।

## केळीखालती न्हाताना

केळीखालती न्हाताना झाला गारवा हिरवा
माझे हळदीचे अंग, वर सायीचा ओलावा

पाणी लख्ख निळे त्यात जरा खेळते आभाळ
माझ्या भरल्या कुशीला टेके बिंबाचे जावळ

वाटे हुंगावी ओलीची मऊ चिकण जमीन
पोसलेल्या शेतातले प्यावे ओंजळीने ऊन

असे काहीबाही मला उगाउगाच वाटते
तेव्हा सळसळूनिया तुझी आठवण येते

माझ्या पाठी घमघमे तुझ्या आठवांचा भास
कौसल्येच्या पावलांत जसा दवण्याचा वास

तुझा भरातला श्वास मला वाऱ्यात कळतो
देवसर्प यावा पुढे तसा गर्भ धसकतो

ऐक, स्वप्नामधे तुझा, फक्त असू दे वावर
केळीखालती मी न्हाते, नको येऊ ना समोर !

## आणि हवे तरी काय ?

घमघमला अंधार जरा माझ्या मागेपुढे
गर्द काळजाच्या वनी जसे केशरकेवडे.

जरी आंधळी मी, तरी मला दिसले प्राक्तन
काळोखाच्या केवड्याला, फुटे प्रकाशाचे पान.

स्पर्शहीन हाती विश्व, किती मऊ मऊ झाले
बाळ गोधडीखालती जणू कुशीमधे हाले.

रस पान्हावले, झाला कृतकर्मांचा उत्सव
जसा भरल्या घरात लक्ष्मीचा पायरव.

मला बहिरीला साद घाली कालिंदीचे पाणी
आली धावत अंगणी दुःखतीर्थाची कहाणी.

घर वाहून जाताना पाठी पापाचे गाठोडे
आणि पिंपळाचे पान पाय टेकायला थोडे.

आले आयुष्य तरून माझे मातीचे हे पाय
आता पिकलेल्या जीवा आणि हवे तरी काय ?

## पाणी

ज्याला हात नाही त्याने कसे पकडावे पाणी ?
हात असून चकावे, असे मायावी हे पाणी.

येते कुठून हे पाणी आणि कुण्या गावी जाते ?
कसे आपुले असून आपुलाच घास घेते ?

डोळ्यांमधे धरू जावे तरी पाऱ्हावते मन
ताज्या तुडुंब लोटात जाते जाणीव वाहून.

कधी शब्दार्थासारखे हसे काळीज सोलून
मयसभेत आपुला होतो वेडा दुर्योधन.

रंग खरा-खोटा याचा, संग हवा-नको असा
कसा प्राक्तनाचा आता सांग अर्थ लावायचा ?

सत्यामागून देखणा असा फिरे सत्याभास
मृगामागून हिंडतो जसा कस्तुरीचा वास.

किती झगडावे तरी याला खूण देण्यासाठी !
होती मृत्तिकेच्या घरी याच्या प्रलयाच्या भेटी.

ज्याची त्यानेच द्यावीत याची सारी देणी-घेणी
कुणापास कधी उरे थोडे पाणी—थोडी गाणी.

## संज्ञेच्या पैलतटाला

संज्ञेच्या पैलतटाला घनगर्द तमाची राने
नागापरि सळसळणारी वाटांची जहरी वळणे

प्रार्थना गहन वाऱ्याच्या घुमतात गुहांच्या कानी
विवरातुन उसळत येते जिजिवीषू उज्ज्वल पाणी

पाण्याच्या खोल तळाशी चमचमती स्फटिक किती हे !
प्रतिमांचे तोरण कुठल्या अज्ञात घराला आहे

त्या घरापलिकडे वसली ही कुठली श्वापदवस्ती
मातीत विजा रुजवून मस्तीत निवाले हत्ती.

या मातीवरती झुलते काहूर निळे कुठलेसे
त्याभवती भिरभिरणारे जन्मांचे गूढ उसासे.

या कृष्णसजल भवताली मरणाचा उग्र सुवास
देहातुन नविनपणाचे पण फुटती कोवळध्यास

संज्ञेच्या पैलतटी मी अंधारओंजळी भरते
अन् ऐलतटाला कविता शब्दांत उजाडत जाते.

## मी बघते

मी बघते
सहज तुझ्या बागेतून
पान एक गळताना
वाऱ्यावर पिकलेला नाद एक रुजताना.

मोहरते
वास तुझ्या असण्याचा
देहावर ढळताना
माझ्यातून एक नवा जन्म रुजून उठताना.

मी हसते
उग्र कठीण सत्यावर
स्वप्न मधुर झुलताना
विश्वासामधुन प्रेम दरवळून फुलताना.

थरथरते
पापांचे, शापांचे व्रण उठून झरताना
करुण रित्या पदरावर नजर तुझी फिरताना.

मी बघते
निर्भय समजूत तुझी
सहज जवळ असताना
आणि मला वेडीला हृदयाशी धरताना.

मी बघते...मोहरते
हसते....थरथरते....मी बघते....

## हे रूपधर प्रेम

एखादी पुराकथा बहरून यावी
युगायुगातून
नव्या संदर्भांनी नवीच व्हावी,
तसं हे प्राचीन सुंदर प्रेम
हृदयातून
जणू काळ्या दगडाच्या गाभ्यातून
लवलवीत चैतन्याच्या वासासारखं
नवीन होत होत
आता संपूर्ण वर आलेलं.
हे रूपधर प्रेम !

अजिंठ्याच्या शिल्पासारखं जुनं
आणि म्हणून नवीनही.
जसं दोहोंचं सहज एक असणं
तसं हे आदिम.
सत्यासारखं याचं रंग बदलणं
अन् सनातन विश्वासाभोवती
परिवर्तनाच्या सहस्र कळांनी स्वाभाविक उजळणं
या आदिमायेचं नाव ' प्रेम '.

पुराकथा बहरून यावी युगायुगातून
तसं हे हृदयातून.

## मेघ उतरले दूर

मेघ उतरले दूर
सूर
जसा वंशवनी ।
रंग विस्कटले जळी
निळी
सांजेची दाटणी ।।

उदी रानातल्या वाटा
काटा
सलावा, मोडावा ।
झाडे कापता शहारा.
वारा
करुण गळावा ।।

साठवले सारे काही
नाही—
नाही व्हावे अब्द ।
मेघ रिते रिते होत
फक्त
ओलवावा शब्द ।।

अशा शब्दावर झुले
ओले
काजळ गगन ।
चंद्र रेखताना, गाणे
म्हणे
मागते मरण ।।

## यक्षरात्र

पाण्यासारखेच । वाहते सदाचे
आयुष्य नावाचे । खुळे गाणे ।।

किनारे धरून । अखंड चालला
दु:खांचा काफिला । मस्तपणे ।।

सुखाचेही तळ । जाताना घासून
अस्तित्वाची खूण । कळे मला ।।

दिव्यापरी आता । प्राक्तन जोडून
प्रवाही सोडून । श्वास दिला ।।

आणि रंगगर्द । क्षितिज पेटले
रात्री उजाडले । क्षणमात्र ।।

तमाने टाकली । प्रकाशाची कात
झाली काळजात । यक्षरात्र ।।

## आयुष्याचा सगळा अर्थ

अस्तित्व सार्थकी लागल्याच्या आनंदात थरथरणारी
उन्हाची कोवळी पाखरं
पाठीवर मिरवणारी, ही चार-दोन अपाप कोकरं....
असा आणि इतकाच असतो आनंद
आपण कुणाला हवे असण्याचा
आयुष्याचा सगळा अर्थ यातूनच असतो सांधून घ्यायचा.

या कोकरांबरोबरच,
ही झिपरी बाभूळ—ते विरळ कुरण
ते बावखोलातलं पाणी
अन् त्याहीपलीकडलं ते उजाड वळण—
या सगळ्याचे संदर्भ लावून समजून घेतले,
तर तुला कळेल मागचं-पुढचं कसं सांधलं जातं,
कोकराच्या डोळ्यांत हे चित्र कसं सांभाळलं जातं....

आता एवढंच कर
ओठ न हलवता, नुसतं घे स्पर्शून
माझ्या केसावरचं, पापणीवरचं हे कोवळं ऊन
मग थरथरेल त्या कोकरांसारखाच आनंद...
आनंद...आपल्याही कण्यातून.

## ओवी

केळीच्या मांडवात । रंग हळदीचे हळदीचे दंग झाले
हिरवे पान माझ्या । मनाचे मनाचे ऊन प्याले ॥

झुंजुमुंजूची चव बाई । माझ्या प्राणांत पानांत रेंगाळते
जशी का राउळाची । वाट झांजेत झांजेत नादावते ॥

सूर्याचा लाल रावा । जरा झुलतो आभाळडहाळीशी
आयुष्य रेखिते मी । थेंब जोडून जोडून रांगोळीशी ॥

वहात्या वारियाचा । काठ धुक्याने मुक्याने पांढुरका
कोण्या ग देशी जाती । माझ्या भूपाळीसारख्या सांद्र हाका ॥

सांगू मी काय सये । दुःख मागुती पुढती रेंगाळता
केतकीबनी जसा । नाग डोलतो डोलतो येता-जाता ॥

दिसाचे रंगगाणे । रोज सकाळी सकाळी नवे होते
दुःखाच्या डोलण्यात । मन हळदीचे हळदीचे ऊन पिते ॥

## नकोच काही

नकोच काही तरिही होते
असती त्याहुन निळे पहाड
म्हटले नव्हते, तरिही वारा
आहे त्याहुन जरा उनाड

असते त्याहून थोडे आणिक
पाणी होते गर्द निळे
सांगितल्याविण उमलत होती
पिवळीरंजन रानफुले

म्हटले नव्हते तरि थोडेसे
आहे त्याहुन हिरवे ऊन
जरा गारवा मिरवत होता
आणिक थोडे सुख माखून

मी न बोलले काही, तरिही
तुझा चेहरा मऊमवाळ
हात तुझे हातांतुन माझ्या
आणिक हा असला भवताल

नकोच काही, तरिही इतुके
आणि प्रियाळा, काय हवे ?
अस्तित्वाचे सुख सोसेना
गाणे गाते एक नवे !

## समंजस हिवाळा

समंजस हिवाळा जेव्हा मध्यरात्री छपरावर निनादत असतो
तेव्हा काहीबाही आठवत राहते.
आठवते तुझे कधीकाळचे सान्निध्य, पुन्हा जे कधीच नव्हते.
हातात भाकरीचा तुकडा घेऊन उंबऱ्याशी
तशी साऱ्या संवेदनांची उत्कटता घेऊन उराशी,
केव्हाची तिष्ठत राहिले मी ऐन हिवाळ्यात !
तू आला नाहीस तेव्हा वाटले, आता सारे संपले.
संपल्या जीवघेण्या येरझारा,
एवढ्यातेवढ्याने झणझणणाऱ्या रक्तातल्या तारा,
संपले समजुतीचे धागे शोधत ऊर फुटेपर्यंत धावणे
अन् संपले ते निळ्या गाण्यामागून तडफडून हसत जाणे.

पण ते संपले नाही.
ते सारे अन् आणखी काही पुन्हाच्या हिवाळ्यात नव्याने धुमारले
त्यांचे नवे छळवाद झाले.
नव्या अनंत रूपांत त्यांनी मला हाकारत नेले.
नव्या जखमांसाठी माझ्यात उगवले नवे जन्म,
अन् काळजाने आता तर घरच उधळून दिले.

एखाद्या हिवाळ्यात तू परत आलास,
( आणि तू येशील,)
तर मात्र आता दार नाही, जिथे मी पूर्वी तिष्ठत राहिले.
उद्ध्वस्त घरात उधळलेले हे आभाळ मात्र,
पूर्वीइतकेच आहे माझ्यासारखे—वाढत असलेले.
तू येशील तर मग हिवाळाच होऊन ये.
समंजस. ते अधिक चांगले.

## अर्पण

तू हवा आहेस.
पण सगळ्या नात्यांनी हवे तसे लचके तोडून घेतल्यानंतर
उरलेले आयुष्य तुझ्यापुढे ठेवताना फार शरम वाटते आहे.
अन् तू समंजस हसतो आहेस.

तसे काहीच नाही मुद्दाम जपलेले
जे तुलाच अर्पण करावे
मन काजळलेलेच आहे.
तू भेटलासही स्वतःसाठी गदगदून येण्याची पहिलीच वेळ
आणि बाहेर स्वच्छ उजाडले आहे.

तू लख्ख करुणेचे हात पसर
आणि मला हृदयाशी धर.
तुला अर्पण असोत माझ्या उरलेल्या आयुष्याचे तुकडे
रक्ताळ... केविलवाणे.
माझी शरम, माझे काजळणे अन् गदगदणे.
अर्पण असो ही सर्वव्यापी लखाख वेदना
अन् हृदयात ही आत्ता उगवू लागलेली
अनाघ्रात प्रेमाची उजळ, कोवळी भावना.

## पाऊस : चार कविता

१

तू भेटलास तो क्षण लख्ख आठवतो,
रक्तासारखा लालबुंद, अजून मनावर तरारतो :
शुष्क पिवळ्या गवतामधले नारिंगी फूल
पहात रहावे चित्र, तशीच निळी भूल....
किंचित् थरारती ओलसर हवा.
आभाळ असे ओथंबलेले की,
आत्ता पाऊस झरझरून यावा
पुढ्यात हिरव्या झाडीवरती कबरा झाकोळ
अन् दूर तरंगत्या पर्वतांची जांभुळभुरकी ओल...

हळुहळू हे सारे मावळत गेले
प्रथम राखी–मग सावळत गेले
उरलास तो तूच–अखंड शुभ्र पाऊस !

या साऱ्या चित्रात एक राहिले
माझे मन. मातीइतकेच भिजले.

२

ऐन मध्यरात्रीच्या वादळवाऱ्यात
तू समोर-माझ्या मोडक्या घरात.
जसा एखादा सजल, संपूर्ण कृष्णमेघ
कपाळावर आठीची उगाच एक वीजरेघ.

मग हसलास केवढ्या लाघवाने;
अन् मला ओढून घेतलेस हृदयाशी.
मी फुटू पहाणारी जुन्या बियांसारखी,
कोसळले चिंब होत तुझ्या हातांशी.

चुलीतला अपुरा प्रकाश तुझ्या केसांवर—चेहऱ्यावर
आणि मी एकाच वेळी भिजेत आणि उबेत अनावर.

३

उगिच नेसले हिरवी साडी, काळे काठ
झुलवित आले जुन्या नदीचे नवखे घाट
पायांत पैंजण चांदीचे
घुंगुरगाणे धुंदीचे
राघू लालस चोळीवरती, केसांतुन पिवळी शेवंती.

तू परदेशी जरी प्रियकरा
तरी फुलांचा गुंफुन गजरा
मी म्हटले ते शकुन गाणे तुझेच होते
मातीखाली झरे कोवळे तुझे वाहते
म्हणून होता प्रवाह झरता
शेवंतीचा गेंद उमलता
राघूंच्या चोचींतुन मोती आणिक मी फुलवंती गरती.

उगा नेसले हिरवी साडी, काळे काठ
सावरली तटल्या चोळीची अहेव गाठ.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५५७१
काव्य
ग्रं. क्र. २०३०८
२५/८०
शाखा (स्थळ प्रत)

४

वृद्ध झाडांच्या रुपेरी पानांतून
पावसाची आत्मीय बोटे फिरली
अन् मातीच्या सुरकुतल्या त्वचेवर
थेंबांची समजूतदार थरथर उठली,
तेव्हा ओंजळभर गारा मी हट्टानं जमवल्या,
तुझ्या निवल्या चेहऱ्यावर पाण्याच्या चवऱ्या उडवल्या.

सौम्य हसत तू थांबवलेस मला
तुझ्या ऊबदार हातात माझा हात-ओला.
ऋतूंचं पिकलेपण तुझ्या हसण्यात
अन् स्पर्शात समंजस पानगळ.
माझ्या घशात आवंढा अकारण.
की तुझ्या प्रौढ सहवासाची कळ ?

बघता बघता तुझा पाऊस कोसळला समोर.
आयुष्याचा तुफान लोट—घनघोर
वाहून गेले घरदार, अंगण, मोर....
धारा विरळ झाल्या आणि सारे स्वच्छ झाले
मातीच्या निवळ वासाने मन भरून गेले
अन् मग मीही सौम्य हसत राहिले,
तुझ्या डोळ्यांतले फिके पावसाळी आभाळ पहात राहिले.

## उत्सव

झाला उन्हाचा उत्सव
थोडा बाहेर दूरात
सोने वितळे हवेचे
थोडे इथे आणि आत

अशी उतू आली माती
जसे वाळ्याचे अत्तर
तिच्या चंदनाची रेघ
माझ्या मेघभाळावर

उन्हे झिरपती खोल
जिथे आसरांचे घर
त्यांचे उजेडाचे हसू
येते फुटू काठावर

खुलभर दुधापरी
मग मनभर रस
हिर्व्या प्राक्तनाच्या घरी
मंद उन्हाचा सुवास

अशात हा निरोपाचा
आला बहराचा वारा
सजे उन्हाचा उत्सव
फुला, उमल ना जरा !

## नाते

त्या वेळी,
चुलीतल्या प्रकाशासारखे सारे काही
माझ्याभोवती भरून असायचे.
म्हणजे असं नाही की,
त्यापलिकडचा अंधार मला माहीत नसायचा.

पण तोही जाळाच्या सावल्यांमधून
भवतीचाच एक भाग बनून जायचा.
चंद्र भाकरी होऊन तव्यावर उतरून यायचा
आणि सुखदु:खांच्या कितीतरी आठवणींचा धूर
भोवती साचत असायचा.

त्या वेळी वाटायचे, तू किती भाबडा !
' माझ्याभवतीनं फिरणाऱ्या या बोक्यासारखाच बोलघेवडा.
अन् शेजेत असायचास कितीतरी बलदंड,
रंगेल आणि थोडा बाईलवेडा

पण एक दिवस त्या सगळ्याच माझ्या आयुष्याला
तू नालायक ठरवलेस;
अन् सहजपणे मला असे उघड्यावर एकटीला फेकलेस.

तुझ्यात गुंतून गेलेले माझे सारे सोडवताना
सगळेच संदर्भ कसे बदलून गेले.
आदिवासी माणसाभोवतीच्या विश्वासारखे
अद्‌भुताचे होत गेले.
सवयीच्या सगळ्या गोष्टींना
क्रूरतेचा एवढा वास असतो, हे तेव्हाच तर कळले.
अन् माझ्या सुखदु:खांचे नि कष्टांचे
सगळे पोकळ अर्थ सावल्यांसारखे समोर नाचत आले.

खरेच,
अंधाराचे नि प्रकाशाचे हे कोणते रसायन तयार झाले ?
परमेश्वरा, तुझे नि माझे हे कोणते नाते
मी आजपर्यंत कल्पीत आले ?

## आत्ता आत्ता ना आलास

आत्ता आत्ता ना आलास
मेघमाळणीच्या वेळी,
उदी संध्येवरी जेव्हा
थरकली रंगजाळी ?

ओल्या हळदी उन्हात
नुक्ते भिजले पाऊल
आणि अंधारमेंदीची
उगा तळव्यांना हूल.

प्राक्तनाच्या डोहावर
मावळता रंगभूल
जसे काळोखात दिवे,
तुझी रुजली चाहूल.

आत्ता आत्ता ना आलास
अशा संधिकाळासाठी
सारा जन्म कसा सांग
गोळा झाला तुझ्या हाती ?

सारसर्वस्वाची गाठ
कशी सुटे तुझ्यापास ?
सांग खरे ना हे सारे ?
की हा नेहमीचा भास ?

## म्हणायचे आहे मला

म्हणायचे आहे मला
आकाश सावळे
दूर निळ्या पहाडात
शुभ्र पाणी खेळे ।

हेही नाही. सांगायची
काळीभोर माती
हिरव्या झोपेत आत
गवताची पाती ।

नाही नाही बोलायचा
श्रीरंग अंधार
आणि त्याचे चाफेगौर
उजेडाचे घर ।

नव्हे. मृण्मय देह हा
मन ओलेसुके
पाखराचे प्राणवेध
आक्रांतासारखे ।

नाहीच हे; काहीबाही
आहे म्हणायचे
हृदयाच्या आत-पात
त्याचे तळे साचे ।

तळ्यातून थेंब येती
शब्द उगा ओले
आतले जसेच्या तसे
वर काय डोले ?

## सहज प्रियाला बघता बघता

सहज प्रियाला बघता बघता डोळे ओले व्हावे
तसेच ओले रान, आणखी हृदय कोवळे व्हावे ।

जुन्या घरातुन वहात यावा, तसा कापरा वारा
रक्तामधुनी जाग्या होती दुःखविजेच्या तारा ।

कुणी कुशीला भिडुन रडावे, तशी गळे पागोळी
म्लान दुपारीवरती हलते सांध्यघनांची जाळी ।

उजेड थोडा दारावरती आत निळी नवलाई
तशात फारा दिवसांनी ही घरात फुलली जाई ।

सुखदुःखांच्या पल्याड कोणी गाणे हलके गाते
किति वर्षांनी श्वासासंगे फूल जिवाचे हलते ।

कितिक दिसांनी भरून आहे निळ्या ढगातुन पाणी
किति दिवसांनी तुला भेटले ! किती किती दिवसांनी !

# पोर

झाल्या तिन्हीसांजा, मायजीवा लागे घोर
कशी अजून येईना घरी परतून पोर ?

पोर ओढाळ पायांची, तिचे देवचाफी डोळे
सांजगवताचा रंग थोडा झग्यावर खेळे ।

तिढ्या वाऱ्याच्या गोफाने मागे बांधलेले केस
आणि म्हणाली पाण्याला, थोडा माळू दे ना फेस ।'

मग विसरली तेही, थेट जाळीत धावली
अर्ध्याकच्च्या गाण्यामध्ये तिला कवँदं घावली

तशी चाखतमाखत गेली डोंगरवाटेने
चार उष्टे सूर मघा, बघा फेकलेले तिने ।

आता उजेडाचे जग असे संपले इथेच
पुढे काळोखाचे रान, नव्हे माणसांचा देश ।

पोर हरवली तिथे, होत्यानव्हत्याची झाली
अर्धीकच्ची गाणी तिला, मला वाटते, बाधली ।

आता भरोसाच नाही तिच्या पोरपणाचाही
घेता चांदण्याचा घोट देही उमलेल काही ।

कधीतरी रानजाई तिला वेढेल छेडेल
तशी सुखरूप घरी पोर नक्कीच येईल ।

तेव्हा रडेल थोडीशी, मग रुसून बसेल
साडी चोळी मिरवत चुटपुटती हसेल ।

दारी पेरून चांदण्या दूर दिगंती पाहील
पिक्या गाण्यांसाठी तिचा जन्म गहाण राहील ।

## सार्थक

हाती न येता जसा अर्थ राहे
प्रभूसारखा दूर कोठेतरी–
तारा तसा एक दूरात आणि
रिकामाच काळोख शब्दापरी।

मला वेदनांचा मृदू गंध येतो
निजेच्या निळ्या अंगणातून रे
स्वतःवाचुनी ना अपेक्षा कशाची
असे प्रेम माझे, मला नावरे।

तुला आठवीता रडू आज येते
फुलांना जशी की दंवाची मिठी
आत्म्यात सारे असे पोचते की
जशी प्रार्थना ओलवीते दिठी।

कधी एकदा वीज झोंबून गेली
तसे गीत नाही पुन्हा भेटले
तुझे हात हातात होते, तसे ना
पुन्हा जीवनाने दिलासे दिले।

तरी प्रेम माझे मला व्यापुनी हे
जसा मंद अंधार चोहीकडे
कधी स्वप्न होऊन येते तसे हे
उभे सत्य हे आर्त माझ्यापुढे।

दिव्यांसारखे ठेवते मी उशाशी
डोळे तुझे दोन भोळे खुळे
शब्दासवे सार्थ होऊन यावे
अता जीवनाला हसू कोवळे।

# भास

कुणासाठी ऊन आले, मला नाही ठावे
डहाळीशी झोंबतात उगीच हे रावे.

कुणासाठी शीळ यांची रानभरी होते ?
एक निळे फूल कसे पानाआड न्हाते ?

घुंगराची काठी वाजे वारा कुठे जाई ?
केळीतल्या उजेडाला धीर कसा नाही ?

फुलचुख्या हिंडतात गात काहीबाही
काय जाणे असा कसा वास हवेलाही !

भास असा काय यांना भलताच व्हावा ?
मालवला होता की ग निजताना दिवा !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

## समजूत

मन वाहत्या पाण्याचे,
डोळां चंद्र होता, सई
शब्द निरंजन होते
बाकी नव्हतेच काही.

शब्दांपल्याड साजण
तेव्हा भेटावया आला
निळ्या पाण्याच्या काठाला
मोर नाचुनिया गेला।

सुख दूर जाते तेव्हा
फक्त स्वप्नभाग होते
दु:ख स्मरणरूपांना
स्वत:चीच आग देते।

वेड्यासारखे असे ग
डोळां पाणी नये आणू
शब्दांपल्याड जे त्याची
अशी गाणी नये म्हणू

असे वाहते हे पाणी
त्याने घालू नये वेढा
घट्ट चिरेबंदी सये
तुझ्या साजणाचा वाडा

फक्त वारा जाय आत
त्याला दे ग चंद्रकोर
आणि विचार एवढे :
‘ आत नाचतो ना मोर ! ’

## असे पाऊल भेटव

वणव्यांनी वेढलेला असा भोवताली माळ
आणि माथ्यावर जुने तडे गेलेले आभाळ

स्वप्न पाहू नये अशी नीज फाटून गेलेली
कुठे हाकेला धावून येशी तूही वनमाळी

पूजेतले शाळिग्राम गेले नर्मदेच्या तळी
न्हाता तीर्थजळी, देहा चढे पापाची झळाळी

होते उघडे रे दुजे, एक झाकता झाकता
तुला डोळे, मला लाज जन्म राखता राखता

अशात ही इथवर ओवी सांभाळली देवा
स्वर, स्वरात आकांत आता अभंग रहावा

फेरा राहू दे, तेवढी जिद्द चालण्याची ठेव
जीव ठेवावा वाटेशी असे पाऊल भेटव

## पुरे नाही का एवढे !

सांग असा कसा तुझा वेडा अट्टाहास पोरी,
कसा नक्षत्रांचा मेणा झुलायचा तुझ्या दारी ?

तुझे चंद्रमौळी घर, त्याला खिडकी ना दार
रुख्या उजाड अंगणी कसा नाचायचा मोर ?

तुझे जग वेडेकोडे, त्याला किती किती बंध,
मर्त्य देही भरशी ग कसा अमराचा छंद ?

व्रतावाचून का कधी मिळे संयमाचा वर ?
तपावाचून का जीव होतो मर्यादांच्या पार ?

तसे काय तुझ्यापास ? फक्त कोळे मन आहे,
निर्धनाला स्वाभिमान असा सोपा नव्हे बाये !

जन्म मातीचाच तुझा, का ग अट्टाहास तरी ?
पुरे नाही का एवढे–शब्द लागलाहे उरी !

## आक्रांत

जत्रेत हौसेने रंगीबेरंगी बांगड्या भराव्या,
तसे तिचे पहिल्यापहिल्याने गाणे रचणे;
आणि चंद्रनक्षीचे प्रहर सावळ्या देहावरून सरकावेत,
तसे अपाप आनंदाने किनारून जाणे—
पुढचा आक्रांत तिला समजलाच नव्हता.

मागाहून सारेच बदलत गेले.
ऋतूंचे बहर गळल्यानंतरची निराश्रित राने
आणि भेगाळ जमिनीच्या बोटांतून निसटत गेलेले
फसवे पावसाळी आभाळ,
यांची करुणाघन दाटी मनावर होत राहिली
तेव्हा गाण्यांचे देखणे भान चुरमडून गेले.
तिच्या हाकांचे टाहो झाले.

अलिकडे तर कोरडे पडतात तिचे ओठ
अन् हुंदक्यांसारखे श्वास अडकतात,
शब्द अभ्रांसारखे तरंगत दूर, आतला घुमट नीरव.
आणि काळजाची प्रार्थना व्हावी असे बळ उरत नाही धमनीत.
तिचा जीव एवढासा, अन् अर्थ केवढाऽ तिच्यापल्याड !

आता तिच्या आक्रांताला अंत नाही.

## घन आले म्हणता म्हणता

घन आले म्हणता म्हणता
पाऊस असा आला की
जरि मिटुन घेतले डोळे
हृदयाची भिजली माती.

तू ओंजळ फक्त पसरली
अन् म्हटले नाही काही
सोसल्या अनावर धारा
जशि सोसत असते बाई.

पाऊस असा एकाकी
हा तुला नवा का आहे ?
ओलांडुन येतो क्षितिजे
तरि उरात निर्मम राहे.

हे असेच, तरिहि तुला गे
उमलवितो याचा संग
अन् नव्या चुड्यासम चढतो
दु:खाला हिरवा रंग.

## समोरच्या घरातला तो म्हातारा

समोरच्या घरातला तो म्हातारा
केशरी आवाजात प्रार्थना म्हणतो भल्या पहाटे
उमलत्या फुलांच्या सुवासासाठी,
आणि दिवसाचे सगळे प्रहर वाहून जाण्यासाठी
वाऱ्याला बळ मिळते.

भर मध्यान्ही
तो निळ्या लख्ख विश्वासाचे मंत्र म्हणतो,
तेव्हा माती ओठ मिटून सोसण्याची दीक्षा घेते
आणि ताठ मानेने उभे राहात, कोवळी पोपटी मूल्ये जपण्याचे
गवताला स्वातंत्र्य मिळते.

तो गातो उत्कट अंधाराचा सुंदर एकटेपणा
संध्याकाळी हरवत चाललेल्या दिवसाच्या सावलीत,
तेव्हा अवघे शब्दांचे जग गदगदत उठते.
आपले शरमिंदेपणही त्याच्या उदार उदासीवर उधळून देते,
विश्रब्ध होते.

मी रोजच खिळून माझ्या लहानशा खिडकीत,
पाहात राहते त्याचे गाणे आणि तो.
माझ्या अस्वस्थ तरुण शब्दांतून हळूहळू जीव भरत जातो.
एक समंजस हिरवेपण माझ्या पिकलेल्या नावीन्यावर पसरत जाते.
मी कवितेसमोर निदान उभी तरी राहू शकते.

## माहेरी बोलवा

चार दिसांवर उभा ओला श्रावणझुलवा
न्याया पाठवा भावाला, तिला माहेरी बोलवा

तिचे काळीज हर्षाने सुपाएवढे होईल
जुने दिवस माळून जीव मिरवू येईल.

नदीकाठाला घागर बाळपाण्याने भरेल
अर्ध्या स्वप्नाचे कौतुक रानकेवडा करेल.

सखी पदर धरेल, ऊन अडेल थोडेसे
ओल्या प्राक्तनमातीत मऊ पावलांचे ठसे

तिच्या अंगावर इथे किती गोंदले निखारे
तिथे फिरेल त्यावरी रक्तचंदनाचे वारे

थोडा मिळू दे गारवा, तिला माहेरी बोलवा,
सोसायचाच ना आहे पुन्हा वैशाखवणवा !

## झोका

झोका मनाचा उंच बांधीला
हिर्व्या गाण्याच्या एका फांदीला
चढे पायांना रंग भुईचा
लाज वाटावी आज मेंदीला

एक पाखरू
दूर देशाचं
भुऱ्या डोळ्यांचं
निळ्या पाखांचं
इथं आलं वो, इथं आलं वो
मन धालं वो, मन धालं वो

काय सांगावा त्यानं आणिला
कोण्या राजाची प्रीत राणीला
सोन्यामोत्याची, प्रीत गुणाची
लाख मोलाची, सर्व्या जिण्याची

प्रीत घुंगरू
हिर्व्या फांदीला
रंग आभाळी
आला पाण्याला
काय झालं वो, काय झालं वो
मन धालं वो, मन धालं वो

पाण्यात नभ निथळू आले
नभात झोके भिरकलेले
झोक्यात प्रीत ल्यायले मन
पायांना भुईच्या रंगाचे धन

## सण

आता सखीच्या गावात
सोनकार्तिक असेल
रेंगाळल्या पाऊलांनी
जाता अश्विन हसेल

शुभ्र दंवाच्या श्वासात
एक उमलेल फूल
एका चांदणपाऊली
उभे आकाश झुलेल

किती घरापल्याडच्या
हाका घराशी येतील
आणि सखीच्या प्राणांचे
काठ दिगंत होतील

सखी सजवेल सण
सुख वेचेल दु:खात
चांदण्याने रंगतील
तिचे कमळाचे हात

मनथेंबांनी घालील
सखी दारात रांगोळी
थुईथुई नाचतील
फूलतोरणाच्या ओळी

आता दिवाळीचा दिवा
तिच्या लागेल दारात
आणि उजेड येईल
थोडा माझ्याही घरात

## शपथ

शब्दांमधून लुकलुकते, उजळून विस्फारते
तेवढेच थोडे सुचत असते ?
त्यापलिकडचे केवढे तरी म्हणायचेच राहते !

बोलतात डोळे मनवाहू
बोटे-तळहात-बाहू
पायांना संवाद सुचतात,
मिठीला स्वगते भुलवाऊ

तरी का सगळे सांगून सरते ?
उरते. खूप उरते.
आयुष्याच्या कडेकडेने पुष्कळच निथळते.

न मरणारे, जिवट असे, पीळदार आग्रही.
कधी कडूशार, तुरट कधी, हवेसे काही,
सगळ्याचे आणखी एक जगणे होते.

उठलेले या आयुष्यातून, पाषाणातून शिल्प जसे,
प्राणवान् स्वयंभू अस्तित्व त्याचे.

हात लांबवून स्पर्श करावा, जवळ इतके.
तरीहि दूर, स्वप्नासारखे ते आपले.
ते अबोल ! जागृती, नीज, त्याहीपलिकडे पुष्कळ उरते.
कवितेच्या जन्मक्षणी फक्त येऊन ते शपथ घालते.

## पाऊस

आभाळ भरुन हे घन ओथंबुन असे
प्रसवाचा उत्सव सजवुन माती हसे.
पाऊस तिच्या मांडीवर तान्हा होतो
खोवून पीस मोराचे, कान्हा होतो.
हिमशुभ्र कळ्यांवर तमात झुकतो जेव्हा
पाऊस रसिक, राधेचा राणा होतो।।

पानात डोलते पान, चहुकडे हिरवे
रानात दाटते रान, रान मनहरवे.
पाऊस कुणा राव्याला दाणे देतो.
तंद्रीत खुळ्या पाण्याला गाणे देतो.
पंखांना देतो दिशा मोकळ्या दाही,
पाण्याला पाऊस रत्नपैंजणे देतो ।।

गीतांना देतो छंद, फुलांना गंध
स्वप्नातुन भरतो रंग रतीचे धुंद.
पाऊस निळ्या अभिसारा लाघव देतो
अन् जवळपणाला नवखे मार्दव देतो.
सजणाच्या स्पर्शातून माळतो ऊन
शपथांना पाऊस ओले आर्जव देतो ।।

पाऊस सोलतो हृदय, कापतो नाती
घनव्याकुळ करतो एकांताच्या राती.
पाऊस पिसाटापरी सरारुन येतो
पदरातिल सारे शब्द हिरावुन घेतो.
आयुष्यच अवघे तहानलेले होता
पाऊस टपोरा अर्थ ओंजळित देतो ।।

## सांज

सखी, सांजावले बघ, रंग मिटले मेघात
निळ्या तंद्रीत पेटली मंद अंधाराची वात।

जरा निवलेला वारा असा मिटून पिसारा
खुळ्या जळावर हळू उठे अजाण शहारा।

तळे सांजेच्या डोळ्यांचे, रान तळ्याच्या काठाला
रान काळोखकळ्यांचे, घर रानाच्या देठाला।

सखी, काळवले सारे. दिशा पुसल्या गे बाई
माझे मोकळेसे घर मधे एकटेच गाई।

किती सहज गाण्याने होते भवताल नवे
हृदयाच्या काठावर जुन्या कहाण्यांचे दिवे।

दिवे लागले घरात, माझ्या घराला न दार
मंद उजळ अंगणी, सांजअंधारा बहर।

दु:ख-गंधाने दाटून अशा फुल्ल येती कळ्या
कोणी बोलवा ग बाई, माझ्या साजणाला भोळ्या।

## जुळू दे ना गाणे

मनापरी निळेभोर गगन मोकळे
भुईपोटी थुईथुई नाचणारी जळे।

जळावरी झुकणारे ब्रह्मांडाचे बिंब
जास्वंदीच्या देठावरी झुले सूर्यथेंब।

देहापरी लवलव हिरवीशी पाने
प्रेमापरी गर्दपणे उतटली राने।

घावापरी खोल, दैवी अंधाराचा श्वास
सुखापरी दुखवून मातीचा ये वास।

रक्तातून यात काय मोहरले ताजे ?
म्हण सई काही, जिवा झोंबलेले जे जे !

उघड ना ओठ, जरा जुळू दे ना गाणे
गाण्याविना खरे का ग माणसाचे जिणे ?

## ऊन

झगमगीत ऊन पडे येणाऱ्या दिवसावर
विलगुन तळमातीला ये कांचन कळसावर

तमगर्भातुन आले, खूण नसे त्याची पण
इतुके हे निष्कलंक तेजाचे तान्हेपण

स्वच्छ निळ्या पाण्यापरि हृदयाची झुळझुळ ही
चिरवांच्छित जे त्याची ये चाहुल मनवाही

सुख भिजवी पावलांस, नजरेला गगन थिटे
सोसत जे आले सल, त्यांवरही सोनपुटे

ऊन असे भवतालुन श्वासातुन दरवळते
रक्तातुन गर्द लाल मर्मविजा खेळवते

काळाचा चेहराच कमळापरि ये फुलून
उजळमृदू कवितेचा कांचनस्वर ये जुळून

## देठ

काही उपजत येते, काही वेचतो आपण
जगताना कोठे जाते आपुले हे ज्ञातेपण!

थोडे सोसल्यानंतर काही मूल्ये मिळतात
दर पुढच्या पाऊली तीही निराळी होतात

सत्य कापुरासारखे कधी तळहाती येई
भुरुभुरु जळताना, आता होते–मग नाही

असे अस्थिराचे भय किती घेरते मनाला
अर्थ काहीच का नाही धावण्याला शोधण्याला?

वाटते की कधीतरी असे धापणे संपावे
मनातळच्या मातीला निळे आभाळ दिसावे

अबोधाच्या कमळाचे कळे हळू उमलावे
आणि त्यात अंतिमाचे राजरूपडे डोलावे

पिकान्वेत अनुभव अज्ञाताच्या रसभारे
जात्या क्षणात भरावे सार्थकाचे गंधवारे

असे वाटते, मिळावा ताठ जगण्याला देठ
भरू यावी सत्त्वार्थाने कवितेची बाळमूठ!

## ढग

माथ्यावरती कौलारू ढग केशरपाणी प्यालेला
जरा खालती डोंगरमाथा सगळा हिरवा झालेला.

निळ्या हवेला कांचनझिलई, रंग मधाचा गवताला
तरुण मनाची उमेद, ऐसा दिमाख भरल्या शेताला.

पायांखाली नितळ वाजते चुरमड पिकल्या पानांची
जरा ओलसर सुखात दुखते कळ मातीच्या गाण्याची.

कुठले कुठले गतजन्मांचे लख्ख कवडसे हृदयात
न कळे कुठल्या सुखदु:खांनी तुडुंब डोळे भरतात.

खोल आतल्या एकांताचा कोण घेतसे कानोसा ?
पूर्ण सोलल्या देहमनाला स्पर्शभास हा कोणाचा ?

मनात आता हा कुठला ढग केशरपाणी प्यालेला
आणिक हाती शब्द कसा हा सगळा हिरवा झालेला ?

## आठवण

विकल करणारे दिवस
तसे सहज अंगावरून उतरून ठेवता येत नाहीत.
जुन्या वाड्यामधून सखीनं हाका द्याव्या,
तशा येतच राहतात त्यांच्या हाका मनापाशी.
एखाद्या रात्री स्वप्नासारखे, तरी सत्यच,
असे करुण दुःख डोळाभर दाटून येते.

तुटण्यातोडण्याचे हिशेब बाजूला ठेवले,
तरी आता पुन्हा जोडले जाणार नसते–काहीच.
त्याही पलीकडच्या वाटा आपण चालून गेलेलो असतो.
तरीही विसरता येत नाही विश्वासाला झालेली जखम,
आणि नात्यांच्या क्षणभंगुरतेचे रक्त
काळाच्या उदास चेहऱ्यावर ठिबकतच राहते.

वारा चांदीचा नाद होऊन वाजत जावा पानांतून
तशी वाजत जाते एक एक आठवण...
एखाद्या अस्तकालीन प्रहरापाशी थांबते सारेच—
पुढचे आणि पाठीमागचे.
कालपर्यंत ओळखीचे असणारे माणूस
असे बघता बघता अनोळखी होऊन गेले,
की काळजाच्या अरण्यातून सैरावैरा धावत सुटते दुःख.
अस्तकालीन प्रहराशी थांबलेल्या आयुष्याला समजावताना
मग आख्खी रात्र निघून जाते.

देण्याघेण्याचे भौतिक मार्ग लांब राहतात,
अशा नात्याचा प्रवास सुरू होतो
एका अटळ आवश्यकतेच्या भूमीवरून

जिथे आंतरसंबंधांची सामायिक जबाबदारी
फार काळजीपूर्वक निभावत न्यायची असते.
हे ज्ञान आपल्याला होतेच ना !
तरी कसे पाहता पाहता
हातामधून आपले माणूस सुटून जाते !
जाता जाता अंगावरचे सारे मोहर खुडून नेते.
अगदी मोकळ्या देहावरचे सुकत येतात व्रण,
तरी कशी अमिट चरचरते
आंतरसंबंधांच्या सामायिक जबाबदारीची ही खोल आठवण !

## कैफ

कसा असतो हा कैफ
मनातळाशी जाण्याचा
आपुल्याच काळोखात
आपुल्याला शोधण्याचा ?

असे सांगता का येते
आता मिळेलच गाणे,
आणि रात्र रडताना
तिचे होईल चांदणे ?

फक्त जायचे आपण
असे मनाच्या तळाशी
कृष्णेसारखे सोडून
केस मोकळे पाठीशी.

युद्धासारखा प्रपंच.
मला गवसेल काय ?
कुणा ठाऊक, शब्दांचे
हाती लागतील पाय !

हाती लागतील पाय
तेव्हा घालायची वेणी,
लख्ख राखेत बसून
मंद म्हणायची गाणी

कसे शब्दांचे प्राक्तन
थेट श्रीरंगासारखे !
जन्म कौतुकाचा धनी
आणि मरण पोरके.

REFBK-0020308
REFBK-0020308
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे